डॉ.विश्वनाथ महादेव आवड

राज्यशास्त्र विभागप्रमुख

शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज

संपर्क क्रमांक 9422028838

# शास्वत विकासासाठी गांधीवादी मॉडेल

**प्रस्तावना** ः

जागतीक पर्यावरणाच्या संकटकाळात पाश्चीमात्य देशांनी स्वीकारलेली भुमीका हानीकारक ठरताना, पृथ्वीच्या पाठीवरील वस्तूमात्राला प्राणीमात्राला शब्दाने,विचाराने वा कृत्याने होणारी दुखापत टाळने म्हणजे अहिंसा असे सांगणारे गांधीविचार महत्वाचे वाटतात. माणूस आणि निसर्ग यामधील असलेले पुर्वापार संबंध व्यापार व व्यावहारामध्ये बदलल्यामुळे निर्माण झालेल्या पर्यावरणीय संकटाला अतिरेकी भौतिकवाद जबाबदार असल्याचे स्पष्टपणे जाणवायला लागले आहे. समस्या कोणतीही असो राजकीय, सामाजीक,आर्थीक किंवा पर्यावरणीय त्यास भिडण्याचे सामर्थ्य गांधीवादी विचारामध्ये निश्चीतच आहे. गांधी विचार मुळात ज्या नैतीक मुल्यावर अधारलेले दिसतात तीच नैतीकता वाढविण्याचे अवाहन गांधीजी वेगवेगळया प्रयोगातून करतात आणि

म्हणूनच कोणतेही प्रकारच्या अर्थशास्त्राने व्यक्तीच्या समाजाच्या किंवा देशाच्या नैतीक आरोग्याला धोका पोहचणार असेल तर ते पाप आहे अशी भुमीका गांधीजी मांडतात म्हणूनच शास्वत विकासाची जीवनशैलीसाठी अंगीकारण्यासाठी गांधीविचार उपयुक्त ठरू शकतात.

गांधीजीनी जगातील सर्वच व्यावस्थांना दाखवून दिले होते की मानवी विकासासाठी काही व्यावहार्य पर्याय मिळू शकताता. भौतिक प्रगती मानवी विकासासाठी आवश्यक असली तरी सातत्याने भौतिक प्रगतीच्या मागे पळत राहीलो तर समस्त मानव जातीचा विनाश अटळ आहे. 1908 साली लिहलेल्या हिंद स्वराज्य या पुस्तकात गांधी म्हणतात अतीविकासामुळे मानवी प्रजाती संकटात येईल. जगातले सर्व विचारवंत पृथ्वी व सृष्टीवर मानवाचे वर्चस्व मान्य करीत असताना अथर्ववेदामध्ये सांगीतल्याप्रमाणे पृथ्वी माझी माता आहे हे भारतीय तत्वज्ञान सांगून गांधीजी पृथ्वीचे संरक्षण ़पोषण आणि मानवी जीवनाच्या सर्व पैलूना विचारात घेवून त्यांच्या परस्पर संबधांची गरज करतात.

**शास्वत विकासाचा गांधीजींचा दृष्टीकोण :**

पृथ्वीच्या पाठीवरील मानव आणि मानवेतर जीवन यांना समान मुल्य आहे आणि त्या सर्वांना जगण्याचा अस्तीत्वासाठी संघर्ष करण्याचा अधिकार आहे त्यामुळे माणूस व चराचर अथवा पृथ्वीवरील विविधता यांना वेगवेगळया कसोटयामधे मोजता येणार नाही असे गांधीजी म्हणतात.

1.गांधीजीनी विसाव्या शतकाच्या सुरवातीला मांडलेल्या समस्या आज 21 व्या शतकातही आपल्यासमोर गंभीरपणे उभ्या राहतात. गरीबी ़ बेरोजगारी ़ हवामान बदल, आर्थीक विषमता पर्यावरणाची हानी या समस्या आजही शंभर वर्षानंतर जशाच्या तश्या किंबहुना जास्तच स्वरूपात जाणवितात. गेल्या शतकामध्ये आर्थीक व भौतीक प्रगती झालेली असली तरी मानवी सुख ही संकल्पना ज्या मानवी आनंदावर अधारीत आहे ती पुर्णत्वाला गेलेली नाही. गांधीजीनी औद्योगीकरण आणि व्यापारीकरण व 1990 नंतर सुरू झालेले जागतीकीकरण यांच्या मुळाशी असलेल्या उणीवा ओळखलेल्या होत्या. पाश्चात्यांच्या उपभोगाच्या संकल्पना या विनाशाकडे वाटचाल करणारया आहेत हे त्यांच्या लक्षात आलेले होते म्हणूनच गांधीजी म्हणतात गरजा मर्यादीत करा. लोकांनी भुकेपेक्षा जास्त खाऊ नये. व्यक्तीने संयमी असायला हवे. लोकांनी आपल्या गरजा मर्यादीत करून वैचारीक शिस्त बाळगावी आणि ते भारतासारख्या विकसनशील देशाला तर आवश्यकच आहे.

2.गांधीजीनी अत्यंतीक व्यक्तीवादाला अवास्तव महत्व दिले नाही. अतीरेकी व्यक्तीवादातून निर्माण झालेली भांडवलशाहीे अनाठायी स्पर्धा निर्माण करते आणि ही स्पर्धा शोषणावरच अधारीत असते. त्यामुळे व्यक्तीवाद जरी मान्य असला तरी सर्वाच्या हितातच व्यक्तीचे हित साधलेला व्यक्तीवाद त्यांना मान्य होता. समाजातल्या श्रीमंताना ते अवाहन करतात की एकतर गरजेपेक्षा जास्त संपत्ती मिळवू नकात आणि जरी असेल तरी तीचा वापर समाजाचे विश्वस्त

म्हणून करा. आपल्याच रक्ताचे लक्षाधीश लोक उपाशीपोटी जगत असताना आपण लक्षाधीश असणे गुन्हा आहे असे गांधी म्हणतात.

3. व्दैत व अव्दैत यातील अव्दैताचे समर्थन गांधीजी करतात आणि त्यामुळे त्यांचा मानव निसर्ग यांच्या ऐक्यावर विश्वास होता. पृथ्वीला सजीव मानणारी वैश्वीक भुमीका त्यांनी समजावून घेतली होती. म्हणूनच गांधी म्हणतात माझा माणसावर विश्वास आहे. एखादा माणूस अपयशी ठरला तर जग त्या प्रमाणात अपयशी ठरेल म्हणून मानवी व अमानवी अशा सर्व प्रजातींच्या सहकार्याशिवाय उत्क्रांन्ती शक्य नाही.

4.पर्यावरण आणि प्रदुषण याचे मानवी आरोग्यावर होणारे परीणाम यांची पुरेपुर जाणीव गांधीजीना होती. विशेषत कामगार व त्यांच्या कामाच्या ठिकाणची परीस्थीतीबददल. व्यक्तीने कोणतीही कृती करताना त्याचा फायदा निसर्ग समाज देश यांना कशाप्रकारे होईल याचा विचार करून जबाबदार नागरीक व्हायला हवे असे गांधी म्हणतात.

5. व्यक्तीची कृती ही त्याच्या भावना नियंत्रीत करीत असे गांधीजी म्हणतात. याबददल एक उदारहण सांगता येते. एके दिवशी गांधीजी लेखन करीत असलेली पेन्सील अधिक टोकदार केलेली त्यांना आढळली. गांधीनी विचारणा करताना मनूबेनला विचारले की पेन्सीलला टोक करताना तु रागात होतीस का? मनूबेनने हो असे उत्तर दिले त्यावेळी गांधीजी म्हणाले इथून पुढे तू रागात असताना पेन्सीलला टोक करीत जावू नकोस ते अधिक धारधार होते आणि त्याचा मला

त्रास होतो. गांधीजीं कृतीतूनही निर्सगाची हानी होवू नये याचा विचार करतात हेच विदीत होते.

6.लोकसंख्येबाबत बोलताना गांधीजी म्हणतात की जगातल्या सर्व लोकांच्या अन्नधान्याची गरज पुर्ण करण्याची ताकद पृथ्वीची आहे पण माणसाची हाव मात्र पृथ्वी पुर्ण करू शकणार नाही. त्यामुळे निर्सगावरचा बोजा कमी करायचा असेल तर लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. पृथ्वीच्या सुरक्षीततेची हमी दयायची असेल तर आत्मसयंमाच्या माध्यमातून आपल्या इच्छांवर नियंत्रण ठेवणे हाच एकमेव उपाय आहे. पृथ्वी, हवा, जमीन, पाणी हा आपल्या पुर्वजांचा वारसा नाही तर ते आपल्या मुलाकडील कर्ज आहे ते नंतर त्यांना दयावे लागणार आहे हे ओळखूनच आपण वागले पाहिजे.

7. शास्वत विकासाची भुमीका तपासत असताना गांधीजीनी स्वच्छतेला दिलेले महत्व विचारात घ्यावे लागते. परीसरातल्या सार्वजनीक अस्वच्छतेमुळे गांधीजी प्रचंड अस्वस्थ होत असत. 1916 साली बनारस येथे केलेल्या भाषणात गांधीजी म्हणाले होते की आपली राहती खोली,घरे,मंदिरे स्वच्छ नसतील तर आपले स्वयंशीस्त स्वयंशासन काय असू शकते याचा विचार केलेला बरा.

8. 1939 साली हरीजनमध्ये गांधी लिहतात की पर्यावरणाच्या नाशामुळे केवळ आपल्या शारीरीक व जैवीक आस्तीत्वाला धोका निर्माण झालेला नाही बौध्दीक व नैतीक पतनही झालेले आहे. गुदमरलेल्या आणि अत्यंत दुषीत वातावरणात आपले स्वातंत्र, सृजनशिलता हरवून बसलो आहोत.

9. आवास्तववादी औघौगीकरणाला गांधीजीनी विरोध केलेला होता. कारण पर्यावरणाला सर्वात जास्त क्षती आदयोगिकीकरण आणि भौतीक विकासाच्या पाठीमागे धावण्याच्या ओढीतून होते. हिंद स्वराज्य मध्ये गांधीजी तसा धोक्याचा इशारा देतात. औदयोगिकीकरणामुळे शहरीकरण होते व शहरीकरण प्रदुषणास कारणीभुत ठरते. म्हणून स्वावलंबी खेडे या संकल्पनमध्येही गांधीजी म्हणतात खेडयाकडे चला. लघुउघोग, कुटीराद्योग यांना चालना दया खेडी स्वयंपुर्ण झाली की शेतकरी व कामगार यांचे उत्पन्न तर सूधारतेच पण निसर्गावरचा भार कमी होतो.

10.गांधीजींच्या मते शेती आणि वनीकरण हे अक्षयी स्त्रोत आहेत ते टिकविले पाहिजेत. जे निसर्गाला सहकार्य करतात ते उत्तम आयुष्य जगतात. साधे जीवन जगण्यासाठी समाधानाची गरज असते आणि हे जीवन खेडयातही जगता येते. शहरातल्या औद्योगीकीकरणामुळे मानवी जीवन वेगवान बनते आणि मग वेळ वाचविण्यासाठी वेगवेगळया साधनांचा शोध लावले जातात. आज प्रत्येकजण पळत आहे. प्रत्येकाकडे वेळेची कमतरता आहे पण त्या पळण्यामधे शांती समाधान नाही आणि शांती समाधान हवे असेल तर निर्सगाला जवळ करणे आवश्यक आहे असे गांधीजी म्हणतात.

**निष्कर्ष :**

1. महात्मा गांधीजी शास्वत विकासाबददलचे विचार तपासत असतान ते विचार कोणत्याही एका साचेबध्द मांडणीमध्ये आढळत नाहीत तर ते गांधीजींच्या

आचरणातून, लिखाणातून, कार्यातून त्यांनी लोकांना दिलेल्या कार्यक्रमातून आपणाला समजून घ्यावे लागतात.

2. गांधीजीच्या काळात आत्ता ज्या पर्यावरणीय समस्यांच्या व्याख्या तयार झालेल्या होत्या त्या तयार झालेल्या नव्हत्या त्यामुळे गांधीजीची अमुक एक चळवळ किंवा कार्यक्रम पर्यावरणवादी होता असे म्हणता येत नाही पण गांधीजीच्या विचारांचा परीणाम निश्चीतच भारतीय पर्यावरण वादयावर झालेला दिसतो.

3.गांधीजींचे वास्तव्य हे जास्तीतजास्त निर्सगाच्या सहवासाताच असायचे त्यांच्या सर्वच आश्रमात आजही विपुल प्रमाणात वेगवेगळया प्रकारचे वृक्ष,झाडे आपल्याला आढळतात. निसर्ग माणसाला कसे जगायचे हे शिकवितो त्यामुळे गांधीजी शास्वत विकासाचे खरे प्रेरक ठरतात.

4.गांधीजी केवळ दूरदृष्टीचे नव्हते तर माणूस व निसर्ग संबंधाचे योग्य आकलन करणारे पर्यावरणवादी होते हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिलेले आहे .

5. एप्रील 2009 मध्ये द टाईम मॅगजीनमध्ये जगाला ग्लोबल वॉर्मीग पासून वाचविण्यासाठी 51 उपाय सांगीतले होते त्यामध्ये 51 वा उपाय कमी उपभोग व जादा भागीदारी आणि सरल जीवन यांचा उल्लेख आढळतो. हळू हळू सर्व जगातील प्रसारमाध्यमे आणि विचारवंत गांधी विचारातील शास्वत विकासाची भुमीका मान्य करायला लागले आहेत.

**संदर्भ :**


1. अल्वीन टॉफलर : फ्युचर शॉक 1911

2. गांधी : यंग इंडिया

3. गांधी : सत्याचे प्रयोग

4. गांधीजी हरीजन मधील लेख

5. गांधी मानव आनि महामानव : जगन फडणीस

6. महात्म्याची अखेर : जगन फडणीस

7. गांधी चरीत्र

8. लोकसत्ता लेख

9. Jha ShreeKrishna "Mahatma Gandhi - An Environmentalist with a Difference"

10. http://oidaijsd.com/Files/08-07-03.pdf

11. http://www.ecorama.org/gandhian-philosophy-of-sustainable-development-12

12.http://www.satyagrahafoundation.org/wp-content/uploads/2015/03/Environ.pdf

13. http://www.gvpwardha.iecit.in/documents/books/env/4.pdf

14. Gandhian Model Towards Sustainable Development Dr. Manjula Upadhyay